
## दिल्लीत तब्बल दोन हजार कोटींचे कोकेन जप्त



**नवी दिल्ली :** ड्रग्जविरोधातील मोहिमेत दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलला पुन्हा मोठे यश मिळाले आहे. रमेश नगर भागातील एका गोदामातून पोलिसांनी सुमारे २०० किलो कोकेन जप्त केले. बाजारात याची किंमत तब्बल दोन हजार कोटी रुपये आहे. विशेष म्हणजे दिल्ली पोलिसांनी आठवडाभरात मिळवलेले हे दुसरे मोठे यश आहे. गेल्या आठवड्यात महिपालपूर येथून ५६० किलो कोकेन जप्त करण्यात आले होते. या कोकेनची किंमत तब्बल पाच हजार कोटी रुपये होती. या प्रकरणी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने या सिंडिकेटशी संबंधित सातव्या आरोपीला अटक केली आहे. अखलाख असे आरोपीचे नाव असून तो उत्तर प्रदेशातील हापूरचा रहिवासी आहे. अखलाखची चौकशी केल्यानंतर स्पेशल सेलने दिल्लीतील रमेश नगरमध्ये छापा टाकून २०० किलो कोकेन जप्त केले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ८५

www.ramprahar.com

शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


'जनतेच्या आरोग्यसेवेला शासनाचे प्राधान्य'/२

आपटा येथील तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या/५

कुंभिवलीतील 'त्या' नागाला अखेर सर्पमित्राने पकडले/७


## उद्योजक रतन टाटा यांना अखेरचा निरोप!

### महाराष्ट्रासह देश हळहळला



**मुंबई : प्रतिनिधी**

यशस्वी उद्योजक, परोपकारी वृत्ती असणारे दयाळू व्यक्तीमत्त्व, प्राणीमात्रांवर पराकोटीचे प्रेम आणि माणसातील माणूसपण जपणारे रतन टाटा गुरुवारी (दि. १०) अनंतात विलीन झाले. वरळीतील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

रतन टाटा यांना अखेरचा निरोप देण्याकरिता देशभरातील असंख्य लोक मुंबईत दाखल झाले होते. पारशी समाजाच्या विधीनंतर विद्युत स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी टाटा यांचे पार्थिव दक्षिण मुंबईतील नरिमन पॉइंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स येथे सकाळी साडेदहा ते दुपारी चार या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

केंद्र सरकारच्या वतीने रतन टाटा यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि इतर मंत्री, विविध पक्षांचे नेते, उद्योजक उपस्थित होते.

**'भारतरत्न' देण्याचा प्रस्ताव**

ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा शोकप्रस्ताव मांडला. या वेळी टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला.

## मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक गुरुवारी (दि. १०) झाली. या वेळी सरकारने निर्णयांचा धडाका लावत नव्याने काही महामंडळ स्थापन करण्यास मंजुरी दिली. सरकारकडून ओबीसी नॉन क्रिमीलेअरचा उत्पन्न टप्पा १५ लाखांपर्यंत नेण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्राकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. धनगर समाज संदर्भातील शुद्धीपत्रक रद्द करण्यात आले आहे.



सध्या टप्पा अनुदान घेत असलेल्या शासनमान्य खासगी अंशत: अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा निधीसह मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. निकषांची पूर्तता केलेल्या ८२० प्राथमिक शाळा, ३,५१३ वर्ग/तुकड्या व त्यावरील ८,६०२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, १,९८४ माध्यमिक शाळा, २,३८० वर्ग किंवा तुकड्या व त्यावरील २४,०२८ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, ३०४० उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, ३,०४३ वर्ग, तुकड्या, अतिरिक्त शाखा व त्यावरील १६,९३२ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, (एकूण ५,८४४ शाळा, ८,९३६ वर्ग/तुकड्या/अतिरिक्त शाखा व त्यावरील एकूण ४९,५६२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी) अनुदानाच्या विविध टप्पावर वेतन अनुदान घेत आहेत. त्यांना २० टक्के अनुदानाचा पुढील टप्पा अनुज्ञेय करण्यात आला.

सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरीत करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे अनेक गृहनिर्माण संस्था या जागेच्या मालक होणार असून त्यांना नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांना सोयीचे व्हावे म्हणून शासनाने हे भूखंड एकरकमी विहीत शुल्क आकारून भाडेपट्ट्यांऐवजी कब्जे हक्काने वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या दोन्ही घटकांची महामंडळ स्थापन करावी अशी आग्रही मागणी होती. पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणासाठीच्या विविध योजना या महामंडळांमार्फत चालवण्यात येतील.

आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) प्रकल्पासाठी केंद्रचालकांना ग्रामरोजगार सेवकांच्या धर्तीवर दरमहा १० हजार रुपये मानधन ग्रामपंचायीतमार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला. आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामुळे पंचायत राज संस्थांचा कारभार संगणीकृत होऊन ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता आणि पारदर्शकता आणणे शक्य झाले आहे.

राज्यात सार्वजनिक प्रकल्पबाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व विकासासाठी नागनाथ आण्णा नायकवडी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व विकास महामंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या प्रकल्पग्रस्तांमधून 'क' आणि 'ड' संवर्गातील पद भरतीसाठी निर्बंध शिथील करून मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. ५० टक्के पदे ही त्याच विद्यापीठांच्या बाधित प्रकल्पग्रस्तांकरिता राखीव ठेवण्यात येतील. याशिवाय इतर अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले, ज्याचा फायदा समाजातील विविध घटकांना होणार आहे.

## विचुंबे येथील गाढी नदीवरील नवीन पुलाचे शानदार लोकार्पण

### विविध विकासकामांचेही भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील विचुंबे गावाजवळील गाढी नदीवर १० कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवीन पुलाचे लोकार्पण भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. ९) झाले. या पुलामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेले अनेक वर्ष विचुंबे येथे नवीन पूल उभारावा अशी मागणी होत होती. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. त्यानुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी या कामाला मान्यता दिली होती.

या पुलाच्या उद्घाटन सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित नागरिकांना संबोधित करत असताना म्हटले की, देशात मोदी सरकार आणि राज्यात महायुतीचे सरकार विकासाच्या दृष्टिकोनातून काम करत असताना वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून लोकांची सेवा करत आहे, तर दुसरीकडे कोट्यवधींचा भ्रष्टाचार करून शेकापचे माजी आमदार विवेक पाटील हे गेली तीन वर्ष जेलमध्ये आहेत. भ्रष्टाचार करून लोकांना देशोधडीला लावणाऱ्या विवेक पाटलांचा फोटो शेकापच्या बॅनरवर लावायला लागतो, त्यांनी आम्हाला अकल्ल शिकवू नये. कर्नाळा बँकेच्या घोटाळ्यात पाच लाखांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी अजूनही तीन हजार लोकांना परत द्यायच्या बाकी आहेत. विवेक पाटलांची पनवेलच्या कोर्टात ज्या वेळेस जामीन अर्जावर सुनावणी सुरू होती त्या वेळेस शेकापचे पुढारी कोर्टात जाऊन बसायचे आणि आज साहेबांची सुटका होईल, पुढच्या तारखेला सुटका होईल आणि एकदा सुटका झाली की आम्ही हत्तीवरून त्यांची मिरवणूक काढू अशा वल्गना करीत होते. **(पान २ वर..)**

### निवडक

#### हिज्ब-उत-तहरीर दहशतवादी संघटनेवर केंद्राने घातली बंदी

**नवी दिल्ली :** दहशतवादाविरोधात केंद्र सरकारची झिरो टॉलरन्स पॉलिसी आहे. दरम्यान, गृह मंत्रालयाने गुरुवारी (दि. १०) जागतिक पॅन इस्लामिक फुटीरवादी संघटना हिज्ब-उत-तहरीरवर बंदी घातली. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार जिहादद्वारे लोकशाही सरकार उलथून टाकून भारतासह जागतिक स्तरावर इस्लामिक राज्य आणि खिलाफत स्थापन करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे या संघटनेला सरकारने प्रतिबंधित संघटना म्हणून घोषित केले आहे.

#### ऐन नवरात्रोत्सवात जोरदार पाऊस; नागरिकांची तारांबळ

**मुंबई :** काही काळ विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार शुक्रवारी (दि. १०) पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. मुंबई, नवी मुंबई, ठाणेसह पुणे व राज्याच्या इतर काही भागांत सायंकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकरांची तारांबळ उडाली. ऐन नवरात्रोत्सवात पाऊस पडत असल्याने दांडियाप्रेमींचीही निराशा होत असल्याचे चित्र आहे. शेवटचे तीन दिवस दांडियासाठी वेळ वाढवून देण्यात आली आहे, पण पाऊस पडत असल्याने व्यत्यय येत आहे.

## अमिटी विद्यापीठातील कामगारांच्या वेतनासंदर्भात १५ दिवसात माहिती द्या

### मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आदेश

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाताण येथील अमिटी विद्यापीठातील कामगारांच्या वेतनासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. १०) बैठक झाली. या वेळी मंत्रीमहोदयांनी दूरदुष्यप्रणालीद्वारे सहभागी होत युजीसी नियमानुसार प्रत्येक कामगाराला किती पगार देणार याची माहिती १५ दिवसांच्या आत मंत्रालयात सादर करण्याचे आदेश अमिटी विद्यापीठास दिले.

आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी राज्य विधीमंडळाच्या मागील अधिवेशनात अमिटी विद्यापीठाकडून भाताण ग्रामपंचायतीला थकीत कर मिळण्याबाबत व विद्यापीठातील कामगारांना शासकीय नियमानुसार पगार मिळण्यासंदर्भात मुद्दे उपस्थित केले होते. त्यानुसार



ग्रामविकास मंत्रालयामार्फत केलेल्या कारवाईमुळे भाताण ग्रामपंचायतीला दोन कोटी २६ लाख एवढा भरघोस निधी मिळाला.

मंत्रालयात गुरुवारी झालेल्या बैठकीत आमदार महेश बालदी यांनी अमिटी विद्यापीठातील कामगारांना युजीसी नियमानुसार पगार मिळाला पाहिजे अशी मागणी केली. शिक्षण विभागाने ती मान्य केली. या वेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठास १५ दिवसांच्या आत युजीसी नियमानुसार प्रत्येक कामगाराला किती पगार देणार आहात याची माहिती मंत्रालयात देण्याचे आदेश दिले. मंत्रीमहोदयांच्या या निर्णयामुळे कामगारांना लवकरच न्याय मिळणार असल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या बैठकीस भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष तथा अमिटी विद्यापीठ नियामक मंडळाचे सदस्य डॉ. अविनाश गाताडे, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, बूथ अध्यक्ष अनिल भोईर, कामगार प्रतिनिधी तकदीर सते, प्रकाश भोईर, दत्तात्रेय पाटील, नितेश पाटील आदी उपस्थित होते.



## इर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे आज लोकार्पण

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवारी (दि. ११) नवी मुंबईतील एका सार्वजनिक कार्यक्रमात इर्शाळवाडी दरडग्रस्तांना नवीन घरांच्या चाव्या देणार आहेत. नुकतीच त्यांनी या नव्याने पुनर्वसित होत असलेल्या गावाला भेट देऊन तेथील कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले होते. विशेष म्हणजे १५ महिन्यांत तीन वेळा मुख्यमंत्री येथे आले.

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीत १९ जुलै २०२३ रोजी दरड कोसळून ८४ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनाग्रस्त वाडीचे चौक मानिवली येथील नम्राचीवाडी येथे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि हा प्रस्ताव फक्त १२ दिवसात परिपूर्ण होऊन त्याला शासनाने मंजुरी दिली. आतापर्यंत ३१ कोटी रुपये या गृह प्रकल्पावर खर्च झाला आहे. दसऱ्याच्या पूर्वसंध्येला आपल्या नवीन हक्काच्या घरी जाण्याचे समाधान आदिवासी बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर आहे.


## नवी मुंबई विमानतळावर आज टेकऑफ व लँडिंग चाचणी

### केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय वायुसेनेच्या एअर क्राफ्ट विमानाचे टेकऑफ आणि लँडिंग शुक्रवारी (दि. ११) होणार आहे. या वेळी केंद्रीय हवाई उड्डाणमंत्री किंजरापू नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ ते ४ दरम्यान ही चाचणी होईल.

मुख्यमंत्री शिंदे यांनी बुधवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सुखोई फायटर जेट उड्डाण करणार असल्याची घोषणा केली होती. नागपुरातील एका कार्यक्रमात त्यांनी हे विधान केले होते तसेच नव्याने बांधलेल्या हवाई धावपट्टीच्या ट्रायल रनसाठी गांधीनगर येथून सी-२९५ संरक्षण वाहतूक विमान व पुण्याहून सुखोई एमके-३० लढाऊ विमान आणले



जाणार आहेत.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विमानतळावर इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीम चाचणी पूर्ण केल्यानंतर अवघ्या एक महिन्यानंतर ही पुढील चाचणी होत आहे. सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ५ ऑक्टोबरला होणाऱ्या दौऱ्याच्या अनुषंगाने ही चाचणी होणार होती, मात्र तांत्रिक अडचणींमुळे ती पुढे ढकलण्यात आली. आता ही चाचणी शुक्रवारी होत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम सध्या सुरू असून पुढील वर्षी मार्चपर्यंत हे विमानतळ पूर्णत: कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

## जल जीवन मिशन अंतर्गत रायगडातील ६१७ योजनांची कामे पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एक हजार ४९६ पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आल्या असून या योजनांपैकी ६१७ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, तर ४३ योजनांची कामे अंतिम टप्प्यात आहेत.



जनतेला स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा यासाठी केंद्र सरकारमार्फत जल जीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने चांगलीच कंबर कसली आहे. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित आहे. जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे गुणवत्तापूर्वक होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत.

या योजनेच्या माध्यमातून १५ तालुक्यांमध्ये एक हजार ४९६ योजनांची कामे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हाती घेण्यात आली आहेत. यामधील ६१७ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करून योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.

> **जल जीवन मिशन अंतर्गत ६१७ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली असून पुढील महिनाभरात ४३ योजनांची कामे पूर्ण होतील. सुरु असलेली पाणीपुरवठा योजनांची कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सूचना ठेकेदार, अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक योजनेच्या कामाची माहिती वेळोवेळी घेण्यात येत आहे. योजनांची कामे त्वरित पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात येत आहेत.**
>
> **-डॉ. भरत बास्टेवाड,**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी,**
> **रायगड जिल्हा परिषद**

## पनवेल महापालिकेचा धडाका; आज पुन्हा विविध विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने विकासाचा धडाका लावला आहे. या अंतर्गत विविध कामांचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि. ११) सकाळी १० वाजता राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे.





या वेळी महापालिका हद्दीतील प्रभाग समिती अ प्रभाग क्र. १मध्ये कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल बांधकाम करणे, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० अंतर्गत सिद्धी करवले तलाव पुनरूज्जीवन व सुशोभीकरण करणे, आडीवली तलाव पुनरूज्जीवन व सुशोभीकरण करणे, मुर्बी येथे १.७५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व डीआय पाईपची वितरण व्यवस्था करणे, खारघर से. १६ प्लॉट नं १३ येथे खेळाचे मैदान विकसित करणे, से. १५ प्लॉट नं. २५, २५बी येथे विरंगुळा केंद्र बांधकाम करणे, से. १५ प्लॉट नं. २५, २५बी येथे उद्यान विकसित करणे, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण सन २०२२-२३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हा स्तर) अंतर्गत महापालिका क्षेत्रातील विविध तलाव व गार्डन परिसर विद्युत व्यवस्थेसह विकसित करणे, खारघर सेक्टर ५ प्लॉट नं.१० व १९ येथे उद्यान विकसित करणे, महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतूद वितरीत निधी अंतर्गत एकूण ६४ ठिकाणी सोलार हायमास्ट बसविणे, **(पान २ वर..)**

# पळस्पे, नांदगावमध्ये कोट्यवधींची विकासकामे

## भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघाचा आमदार महेश बालदींच्या कुशल नेतृत्वाखाली विकास होत आहे. त्यानुसार आमदार महेश बालदी यांच्या १३ कोटी रुपयांच्या निधीमधून पळस्पे आणि नांदगाव विविध विकासाची कामे करण्यात येणार आहेत. या कामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१०) झाले.

आमदार महेश बालदी यांच्या १० लाख रुपयांच्या निधीमधून पळस्पेमधील पोलीस कॉलनी अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण, ३० लाखांतून तुलसीविहार ते छत्रपती शिवाजी महाराज नगर पाडा रस्ता काँक्रिटीकरण, चार कोटी २५ लाख रुपयांच्या निधीमधून नांदगाव ते आदिवासीवाडीपर्यंतचा रस्ता, आठ कोटींच्या निधीमधून नांदगावमध्ये ब्रिज बांधणे, ५० लाखांच्या निधीमधून स्मशानभूमी रस्ता, अंतर्गत रस्ते, गटारे, २० लाखांच्या निधीतून अंतर्गत रस्ते आणि गटार तसेच ११ लाख २० हजार रुपयांच्या निधीमधून नांदगावमध्ये अंगणवाडी बांधण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

या कार्यक्रमावेळी भाजप पळस्पे बुथ क्रमांक ५५व्या अध्यक्षपदी राजन वारके यांची नियुक्ती करण्यात आली. त्या संदर्भातील नियुक्तीपत्र तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी राजन वारके यांना देऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमावेळी उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका उपाध्यक्ष सुरज भोईर, गाव अध्यक्ष सुनील गवंडी, माजी उपसरपंच दिनेश बेडकर, अजय तेजे, बंड्या चौधरी, माजी सरपंच रघुनाथ गवंडी, संजय वारके, राजन वारके, राकेश कांबळे, अनिल महालकर, माजी सरपंच सचिन देशमुख, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सरपंच विजते भोईर, माजी प्रभारी सरपंच मनोहर भोईर, सदस्य कल्पेश पाटील, विक्रम फडके, ज्येष्ठ कार्यकर्ते बाबूराव पाटील, माजी उपसरपंच संदेश भगत, बाळकृष्ण फडके, आदित्य गायकर, मिथुन शितकंदे, आनंत शितकंदे, महेंद्र खुटले, प्रेम शितकंदे, शिवराम पाटील, कार्यकर्ते उपस्थित होते.

# जनतेसाठी आरोग्यसेवेला शासनाचे प्राधान्य -उपमुख्यमंत्री अजित पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शासनाने शेतकरी, कष्टकरी, शिक्षण, महिला यांच्या प्रश्नासोबतच राज्यातील जनतेच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय नगरीतील विविध वास्तूंचे उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रिमोटद्वारे करण्यात आले .

या वेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेश पाटील, माजी आमदार अमल महाडिक, महेश जाधव, आदिल फरास, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सत्यवान मोरे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, एक लाख लोकसंख्येकरीता जेवढे डॉक्टर असणे अपेक्षित आहे तेवढे डॉक्टर सध्या नाहीत. तथापि, एक लाख लोकसंख्येसाठी किमान १०० डॉक्टरांची सुविधा देण्याच्या दृष्टीने सरकारची वाटचाल सुरू असून त्या अनुषंगाने विद्यमान सरकारने राज्यात नव्याने दहा वैद्यकीय रुग्णालयांची निर्मिती केली आहे. भविष्यात आणखी काही वैद्यकीय रुग्णालये उभारण्यात येतील. या कामाकरीता निधीची कमतरता भासणार नसल्याची ग्वाही देऊन कोल्हापूरच्या पर्यटन विकासासाठी तब्बल १४०० कोटी रुपयांच्या आराखड्याला शासनाने मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, सर्व सोईसुविधा कोल्हापूरमधूनच उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न असून त्याचाच परिपाक म्हणून सुमारे ८३७ कोटी रुपयांच्या विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे.



**पनवेल : आदिशक्तीचा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात सुरू आहे. त्यानिमित्त पळस्पे आणि चिपळे येथे आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, सार्थक पाटील आणि संस्कृती पाटील आदी उपस्थित होते.**

# भटक्या विमुक्तांचा निर्धार, पुन्हा एकदा भाजप महायुती सरकार!



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाजप भटके विमुक्त आघाडीची राज्यस्तरीय विस्तारित बैठक मुंबईतील नरिमन पॉईंट येथील भाजप प्रदेश कार्यालयात झाली. या बैठकीमध्ये येणाऱ्या निवडणुकीमध्ये आपली जबाबदारी प्रत्येकाने पार पाडण्यासाठी डॉ. भागवत कराड यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी भटके विमुक्त आघाडीचे राज्य प्रभारी व प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्रदेशाध्यक्ष राहुल केंद्रे यांनी अशी मागणी केली की, आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनासुद्धा मान सन्मान दिला जावा व कामाची जबाबदारीदेखील आपण घ्यावी.

या बैठकीमध्ये कोकण सहसंयोजकपदी डॉ. दिगंबर गीते यांची निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

बैठकीस प्रदेश सरचिटणीस अशोक चोरमले, गोविंदा गुंजाळकर, संतोष आव्हाड, राजू साळुंखे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, खोपोली शहराध्यक्ष संतोष लोहार, चंद्रकांत मंजुळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# माथेरान भाजप पदाधिकारी देवीचरणी नतमस्तक

**माथेरान : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवानिमित्ताने माथेरान येथील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी येथील युवा रुखी वाल्मिकी गुजराती समाज मंडळाच्या देवीची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले.

भाजप माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी वाल्मिक नगर विभागातील युवा रुखी वाल्मिकी गुजराती समाज मंडळाच्या दुर्गामातेचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, भाजप शहर सरचिटणीस राजेश चौधरी, भाजप आदिवासी मोर्चा तालुका अध्यक्ष संदीप कदम, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, राकेश चौधरी, उद्योजक शैलेश चाफेरकर, धनंजय कदम आदी उपस्थित होते.







**पनवेल : चिपळे येथील कै. रामचंद्र कुरुळकर बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या आदिवासी कर्णबधीर/मतिमंद निवासी विद्यालयात भाजपचे तालुक्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांचे नातू सार्थक पाटील व संस्कृती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तांदूळ, तेल, फळे व नाश्त्याचे वाटप करण्यात आले. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस प्रल्हाद केणी, युवा मोर्चाचे विश्वजित पाटील आदी उपस्थित होते.**






**पनवेल : शारदीय नवरात्रोत्सवाच्या आठव्या दिवशी जरी मरी मंदिर सुकापूर येथून प्रेरणा मंत्र घेऊन गुरुवारी दौड सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत संपूर्ण सुकापूरमध्ये दौड काढण्यात आली. नंतर दौड गावदेवीच्या मंदिरात येऊन पोहचली. तेथे देवीची आरती, श्लोक व गोंधळ घेण्यात आला व नंतर पुन्हा जरी मरी मंदिरात येऊन ध्येयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.**

पान १ वरुन

## विचुंबे येथील गाढी नदीवरील नवीन पुलाचे शानदार लोकार्पण

शेकाप पुढाऱ्यांची ही मानसिकता आहे. विवेक पाटील काही कोणत्या आंदोलनामुळे जेलमध्ये गेले नाहीत, तर ते लोकांच्या घामाचे पैसे लुबाडून घोटाळा करून जेलमध्ये गेले आहेत. हजारो ठेवीदार, खातेदारांचा तळतळाट अजूनही विवेक पाटलांना लागतोय आणि म्हणूनच त्यांना जामीन मिळत नाही हे त्यांच्या बगलबच्चांनी लक्षात ठेवले पाहिजे, अशा शब्दांत आमदार प्रशांत ठाकूर यांनी कानउघडणी केली.

दरम्यान, या वेळी १० कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवीन पुलाचे उद्घाटन, तर एक कोटी रुपयांच्या निधीतून विचुंबे गावात अंतर्गत गल्लीचे काँक्रीटीकरण, ५० लाख रुपयांच्या निधीतून विचुंबे अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, विचुंबे बौद्धवाडा ते ग्रीन व्हॅलीपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण आणि विचुंबे पोलीस चौकी ते सारनाथ बुद्धविहार ओमकार पार्कपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन झाले.

या सोहळ्यांना भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, उसर्ली ग्रामपंचायतीचे उपसरपंच नितीन भगत, अध्यक्ष के.सी. पाटील, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, बळीराम पाटील, रवींद्र भोईर, अविनाश गायकवाड, जगदीश भोईर, डी.के. भोईर, संजित भिंगारकर, तुकाराम भोईर, विवेक भोईर, सदस्य मुकेश भगत, अमित भोईर, भरत पाटील, अप्पा गायकवाड, विभूती सरते, आरती गायकवाड, श्रावणी भोईर, प्रगती गोंधळी, अमित म्हात्रे, प्रमिला म्हात्रे, जयश्री म्हात्रे, ज्योती भोईर, स्वाती सुरते, रंजना सुरते, हर्षदा भिंगारकर, बबिता भोईर, सोनम म्हात्रे, निलम भिंगारकर, नविता भोईर, विशाखा सुरते, अक्षता गायकवाड, भावना भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेचा धडाका; आज पुन्हा विविध विकासकामांचे भूमिपूजन

अमृत अभियान २.० पाणीपुरवठा योजनेंतर्गत बेलपाडा येथे ४.८० लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व डीआय पाईपची वितरण व्यवस्था करणे, महापालिका क्षेत्रातील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करणे, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजनेंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील विविध उद्यानांचा विकास करण्यासाठी नवनवीन साधने उपलब्ध करून देणे, विविध उद्यानांत मुलांच्या विरंगुळ्यासाठी आधुनिक व आकर्षक साधने उपलब्ध करून देणे, विविध उद्यानात कलाकृती निर्मिती करणे या कामांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.


## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या सर्वत्र नवरात्रोत्सवाची धूम सुरू असून ठिकठिकाणच्या नवरात्रोत्सवांना भेट देण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडत आहेत. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.९) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ९७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख १४ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. अनधिकृत पार्किंग, विनापरवानाधरक, अल्पवयीन चालक, ओव्हरटेक करणे अशा प्रकारच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# सीकेटी मराठी प्राथमिक विद्यालयात आजी-आजोबा दिन उत्साहात






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयामध्ये पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातर्फे बुधवारी (दि.९) आजी-आजोबा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त आजोबा हभप पद्माकर रामचंद्र पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सुमधूर असे ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले, तसेच उपस्थित सर्व आजी-आजोबांचे विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

आजी-आजोबा दिनाचे औचित्य साधून पारितोषिक वितरणाचा सोहळा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान काही विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषण व आजी आजोबांबद्दल मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या शेवटी हभप. पद्माकर रामचंद्र पाटील यांनी उपस्थित आजी-आजोबांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, पालक प्रतिनिधी श्री.बडेकर, सौ. पैर, सौ.परभणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी केले.

# पनवेलमधील एकही रस्ता नादुरूस्त राहणार नाही -आमदार प्रशांत ठाकूर

## विविध ठिकाणी रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या पनवेल तालुक्यातील एकही रस्ता नादुरूस्त राहणार नाही याची काळजी भाजपने घेतली आहे. महायुतीचे सरकार विकासकामांना निधी देऊन सर्वसामान्यांना ताकद देत आहे. भाजपचा कार्यकर्ता हा गावातील जनतेच्या विकासासाठी झटणारा कार्यकर्ता आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामीण भागातील विकासकामांच्या भूमिपूजनावेळी बुधवारी (दि.९) केले.

पनवेल मतदारसंघाचे कार्यक्रमाट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाचा कायापालट होत आहे. त्यानुसार सहा कोटी ५० लाखांच्या निधीतून राज्यामार्ग क्र.१०३ ते कोंडीचीवाडी जोडरस्त्यावर गाढी नदीवर पुलाचे बांधकाम, एक कोटी ५० लाखांच्या निधीतून राष्ट्रीय मार्ग १०३ ते धोदाणी चिंचवाडी रस्ता तयार करणे, २० लाखांच्या निधीतून उमरोली गावांतर्गत रस्ता, ८० लाखांच्या निधीतून सुकापूरमधील धम्मगिरी सोभवताली सुशोभीकरण, बुद्धविहाराकडे जाणारा रस्ता तसेच तक्षशिला बुद्धविहाराकडे जाणारा रस्ता तयार करणे, ८५ लाखांच्या निधीतून देवद गावात अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण, दोन कोटी ५० लाखांच्या निधीतून नेरे मालडुंगे रस्त्याचे रुंदीकरणाच्या कामाचे भूमिपूजन तसेच ६५ लाखांच्या निधीतून उमरोली येथे नळपाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी झाले.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, जि.प.चे माजी सदस्य अमित जाधव, पं.स.चे माजी सदस्य राज पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, सुकापूर गाव अध्यक्ष राजेश भगत, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, मालडुंगेचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, सदस्य अर्जुन कांडी, विष्णू पारधी, माई खंडवी, वनिता वाघ, काळुराम वाघ, ताई भस्मा, बुथ अध्यक्ष कमळू चौधरी, रोशन पाटील, जिल्हा चिटणीस आत्माराम भस्मा, माजी सरपंच जोमा निरगुडा, तनुजा दोरे, विकास भगत, गणेश शिद, राघो भस्मा, अनंता कांबडी, दीपील पाटील, महादू भुकरे, आंबो दोरे, काळुराम कांबडी, कमळ्या ढाकरे, कान्या दोरे, गुला उघडा, यमुना दोरे, अनंता दोरे, धर्मा भुकरे, नारायण भुकरे, कमळ्या भुकरे, दामोदर चौधरी, धर्मा पारधी, चाहू चौधरी, चाहो उघडा, कानू वीर, विष्णू वीर, सिताराम शिद, दत्ता झुगरे, किसन चौधरी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.





उलवे नोड : उलवे बंगलो सांस्कृतिक परिषद सेक्टर ८ व अर्बन बेंगॉली वेल्फेअर ट्रस्ट सेक्टर ५ येथे टीआयपीएलचे संचालक अमोघ प्रशांत ठाकूर यांनी नवरात्रोत्सवानिमित्त दुर्गामातेचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यासह गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, सुहास भगत, जयवंत देशमुख, पी.के. ठाकूर, शशिकांत ठाकूर, आनंददीप सेनगुप्ता, बाप्पादित्य पॉल, दिबेंदू बॅनर्जी, सोमायो मजुमदार, अरिंदम देब, रजत सुभ्रो शोमे, बिप्लब सेनगुप्ता, डॉ. वरूणकुमार शर्मा, अर्बन बेंगॉली वेल्फेअर ट्रस्टचे प्रेसिडेंट धनंजय भट्टाचार्य, व्हाईस प्रेसिडेंट देबाशिश दास, सेक्रेटरी सुजित दास, देबराज मजुमदार, एक्झिक्युटीव्ह मेंबर संजय शर्मा आदी उपस्थित होते.

नियमित वाचा दै. रामप्रहर









## संपादकीय

# नतमस्तक करणारा आदर्श

समाजाचे ऋण फेडणे हे टाटांच्या 'डीएनए'मध्ये आहे असे म्हणणाऱ्या रतन टाटांनी 'क्लास' अर्थात 'अभिजातते'चा एक आगळाच उत्तुंग आदर्श आपल्या जीवनशैली व कार्यशैलीतून समाजापुढे ठेवला व त्यामुळेच त्यांना या देशातील सर्वसामान्यांच्या मनामध्ये अपार आदराचे अढळस्थान प्राप्त झाले.

**भारतीय उद्योगविश्वामधील अग्रणी कंपनी राहिलेल्या टाटा उद्योग समुहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांचे बुधवारी रात्री उशीरा निधन झाले. रतन टाटा प्रकृती अस्वास्थ्यामुळे इस्पितळात असल्याची बातमी तीन-चार दिवसांपूर्वी समोर आली होती. परंतु त्यानंतर स्वत: रतन टाटा यांनी आपली तब्येत ठीकठाक असून वयामुळे व तत्संबंधी वैद्यकीय कारणांमुळे आपण चेकअपसाठी इस्पितळात असल्याचे सांगत गैरसमज पसरवू नयेत असे आवाहन 'एक्स'वरून (पूर्वाश्रमीचे ट्विटर) केले होते. त्यांनी स्वत: केलेल्या या खुलाशामुळे देशभरातील त्यांच्या असंख्य चाहत्यांना दिलासा मिळाला होता. परंतु सोमवारी त्यांनी केलेले हे ट्वीट दुर्दैवाने अखेरचेच ठरले आणि बुधवारी रात्री उशीरा अवघ्या देशाकरिता दु:खद असलेली रतन टाटा यांच्या निधनाची बातमी आली. एक उद्योजक एखाद्या देशाच्या नागरिकांमध्ये किती अपार आदराचे स्थान कमावून असू शकतो याचे दर्शन गुरुवारी दिवसभर समाजमाध्यमांवर व प्रत्यक्षातही घडत राहिले. गडगंज श्रीमंत व आघाडीचे उद्योजक असूनही रतन टाटा यांच्या ठायी कायमस्वरुपी नजरेस पडणाऱ्या साधेपणाच्या, विनम्रतेच्या आणि सर्वसामान्यांसाठी त्यांनी संवेदनशीलतेने केलेल्या अफाट सेवाभावी कार्याच्या आठवणी आणि किस्से कित्येकांनी नमूद केले. आपण कोण आहोत, काय आहोत याचा दिमाख तिळमात्रही न मिरवता अत्यंत साधेपणाचा आदर्श त्यांनी आपल्या दैनंदिन व्यवहारातून घालून दिला. त्यांच्यासारख्या मोजदाद करता न येण्याइतक्या श्रीमंत व्यक्तीने बहुमजली महालात राहण्याचा शिरस्ता अवतीभवती दिसत असताना रतन टाटा मात्र साधेपणाने एका फ्लॅटमध्ये वास्तव्य करून राहिले. त्यांचे श्वानप्रेमही त्यांच्या पाळीव कुत्र्यांपुरते मर्यादित नव्हते. टाटा समुहाच्या कार्यालयाभोवतीच्या व ताज हॉटेलच्या परिसरातील भटक्या कुत्र्यांचेही ते आपल्या पद-प्रतिष्ठा यांचा बाऊ न करता बिनदिक्कत लाड करत. मुळातच त्यांनी कधीही, कुठल्याही ठिकाणी आपले 'द रतन टाटा' असणे अनाठायी मिरवलेच नाही. आपल्या प्रतिष्ठेची झूल सहजपणे बाजूला सारून ते संपर्क येणाऱ्या प्रत्येकाशी जोडले जात. अर्थात हा वारसा, हे खास 'टाटापण' त्यांना त्यांचे पूर्वसुरी जेआरडी टाटा यांच्याकडूनच मिळाले होते. १४४ वर्षांची दिमाखदार परंपरा असलेल्या टाटा उद्योग घराण्यातली ते पाचवी पाती होते. १९६२ पासून या समुहातील विविध कंपन्यांमध्ये काम करून पुरेसा अनुभव गाठिशी बांधल्यानंतर १९९१ साली रतन टाटा यांनी कंपनीची धुरा खांद्यावर घेतली. त्यानंतर काही काळातच रुसी मोदी यांच्यासारख्या ज्येष्ठांना बाजूला करण्याचा धीट निर्णयही त्यांनी घेतला. पुढे टाटा हा ब्रँड अधिक दमदार कसा होईल या दृष्टीने अनेक निर्णय त्यांनी घेतले आणि जागतिकीकरणानंतर विदेशी कंपन्या भारतात शिरकाव करत असताना टाटाला दिमाखात परदेशातही नाव कमावून दिले. सरकारी मदतीची गरज नसलेल्या उद्योगक्षेत्रांमध्ये त्यांनी आपल्या समुहाला मोठे केले आणि सुयोग्य वेळी समुहाच्या अध्यक्ष पदावरून पायउतार होऊन त्याही संदर्भात आदर्श घालून दिला. निवृत्तीनंतरही ते शांतपणे आणि अधिक जोमाने सेवाभावी कामे करत राहिले. त्यांचे उपभोगशून्य जीवन एक आगळाच आदर्श आजच्या चंगळवादाने बरबटलेल्या जगात सर्वांसमोर ठेवते आणि म्हणूनच प्रत्येकाला त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावेसे वाटते.**

# बेवारस मृतदेह ठरताहेत पोलिसांची डोकेदुखी

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

समुद्रकिनारे, गड, किल्ले, तिर्थस्थाने, विविध पर्यटनस्थळे अशी रायगड जिल्ह्याची ओळख आहे. याचबरोबर आता औद्योगिक जिल्हा म्हणूनही रायगडची ओळख निर्माण झाली आहे. बंदर, रेल्वे आणि रस्त्याने रायगड जिल्हा इतर जिल्ह्यांशी जोडला गेला आहे. त्यामुळे रायगड हा झपाट्याने विकास होणारा जिल्हा आहे. येथे नागरीकरणदेखील वेगाने होत आहे. बदली आणि विकास ही काळाची गरज आहे. विकासाबरोबर काही समस्यादेखील येतात. प्रदूषण वाढते, सांस्कृतिक आक्रमण होतात. त्याचबारोबर गुन्हेगारीदेखील वाढते. हे सर्व परिणाम रायगडात होताना दिसत आहेत.

सिंधुदुर्ग व रत्नागिरी या कोकणातील जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड जिल्ह्यात गुन्हेगारी वाढ आहे. खून करण्याचे प्रमाण वाढले आहे. खून करून मृतदेह निर्जनस्थळी फेकून दिले जातात. केवळ रायगड जिल्ह्यातीलच नव्हे; तर इतर जिल्ह्यातूनदेखील खून करून मृतदेह रायगड जिल्ह्यात फेकले जातात. हे प्रमाण मागील काही माहिन्यात वाढले आहे. हे बेवारस मृतदेह रायगड पोलिसांची डोकेदुखी ठरत आहे.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर येथील नागरीकरणातही वाढ होत असून जिल्ह्यातील गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले आहे. याचबरोबर गुन्हेगारीचे स्वरुपही बदलले असून गुन्ह्यांची उकल करताना पोलिसांची दमछाक होत आहे. १ जानेवारी ते ३० ऑगस्ट या कालावधीत रायगड जिल्हा पोलीस आधीक्षक कार्यक्षेत्रात ९७ मृतदेह सापडले. या बेवारस मृतदेहांची ओळख पटवून गुन्ह्यांची उकल करण्याचे काम रायगड पोलिसांना करावे लागत आहे. हे सर्व मृतदेह रायगड जिल्ह्यातीलच व्यक्तींचे असतात असे नाही. इतर जिल्ह्यात खून करून मृतदेह रायगड जिल्ह्यात फेकून दिले जाता. शिना बोरा प्रकरणामुळे रायगड जिल्ह्यात फेकल्या जाणाऱ्या मृतदेहांची प्रकरणे उजेडात आली. शिना बोराची मुंबईत हत्या करून तीचा मृतदेह पेण तालुक्यातील जंगलात फेकून देण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात नवी मुंबईतील दोन इस्टेट एजंटचा खून करून त्यांचे मृतदेह रायगड जिल्ह्यात फेकून देण्यात आले होते.

शेजारच्या जिल्ह्यात खून करून मृतदेह रायगड जिल्ह्यात आणून फेकून दिले जातात. काहीवेळा पर्यटनासाठी आलेले पर्यटकदेखील आत्महत्या करतात. त्यांचे मृतदेह तेथेच पडून राहतात. सापडलेल्या मृतदेहांचे तीन ते सात दिवसात अंत्यविधी करायचे असते. कित्येकदा पोलिसांना तपास करण्यास काही महिने लागतात. परिणामी मृतदेह सडू लागतात. या मृतदेहाचे अंत्यविधी करण्याची जबाबदारी ही पोलिसांची असते. अंत्यविधीचा खर्चही पोलिसांना करावा लागतो, तर काही वेळेस स्थानिक स्वराज्य संस्थांची बेवारस मृतदेहावर अत्यंसंस्कार करण्यासाठी पोलीस मदत घेतात.

रायगड जिल्ह्याच्या सीमा ठाणे, पुणे, सातारा या जिल्ह्यांना लागून आहेत. त्यामुळे रस्त्याने रायगड जिल्ह्यात येणे सहज शक्य होते. जिल्ह्यात समुद्रकिनारा आहे. काही ठिकाणी घनदाट जंगल आहेत. अनेक निर्जनस्थळे आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात मृतदेह फेकून दिले जातात. काही वेळा समुद्रात बुडालेल्यांचे मृतदेह रायगडच्या किनाऱ्यांवर वाहून येतात. खालापूर व पेण परिसरात बेवारस मृतदेह सापडण्याचे प्रमाण जास्त आहे. खालापूर महामार्गाला लागून आहे. जंगल परिसर आहे. त्याचप्रमाणे पेण तालुक्यातदेखील रस्त्याच्या बाजून जंगल आहे. तेथे पोहचणे सहज शक्य होते. यातील बहुतेक मृतदेह खून करूनच फेकलेले असतात. काहींची ओळख पहाटे. काही ओळखण्याच्या पलिकडचे असतात. ज्यांच्या बाबत गुन्हे दाखल होतात त्यांचा शोध घेतला जातो, परंतु ज्यांची ओळख पटत नाही त्यांचे शवविच्छेदन करून पोलीसच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करतात. एखाद्याबात कुणी चौकशी केली तर त्याची माहिती दिली जाते, परंतु हे करत असताना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. जे काही मृतदेह सापडेले आहेत त्याच्या शरीरावर जखमा सापडल्या आहेत. याचा अर्थ त्यांचा खून करून मृतदेह फेकून देण्यात आले आहे. त्याचा तपास आद्याप लागलेला नाही. असे अनेक जणांचे मृतदेह रायगड जिल्ह्यात फेकून देण्यात आले. काहींची ओळख पटली काहींची ओळख पटू शकलेली नाही. हे बेवारस मृतदेह रायगड पोलिसांची डोकदुखी वाढवत आहेत.


बेवारस सापडलेले मृतदेह

अलिबाग ३, मांडवा सागरी १, कोलाड २, नागोठणे २, पाली २, माणगाव ७, गोरेगाव २, श्रीवर्धन ३, महाड तालुका १, महाड शहर ३, महाड एमआयडीसी २, पोलादपूर ३, वडखळ ७, पेण १४, दादर सागरी १, रसायनी ३, खालापूर १२, खोपोली ८, कर्जत १०, नेरळ ६.

# भारतीय चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन

अमिताभ बच्चन (जन्म : ११ ऑक्टोबर १९४२) हे एक भारतीय चित्रपट अभिनेते, चित्रपट निर्माते, दूरदर्शन सूत्रसंचालक, माजी राजकारणी आहेत, जे त्यांच्या हिंदी चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहेत. भारतीय चित्रपटांच्या इतिहासातील सर्वात प्रभावशाली अभिनेत्यांपैकी एक म्हणून त्यांची ओळख आहे.

अमिताभ यांचा जन्म १९४२मध्ये अलाहाबाद येथे हिंदी कवी हरिवंशराय बच्चन आणि त्यांच्या पत्नी, सामाजिक कार्यकर्त्या तेजी बच्चन यांच्या घरी झाला. त्यांचे शिक्षण नैनिताल येथे आणि दिल्ली विद्यापीठातील किरोरी माल महाविद्यालयात झाले. त्यांनी विज्ञानशाखेतली पदवी संपादन केली. ऐन विशीत कोलकत्यातील एका जहाजवाहतूक कंपनीतील एजंटाची नोकरी सोडून देऊन अभिनयात कारकीर्द करण्याचा निर्णय अमिताभ यांनी घेतला. १९६९मध्ये भुवन शोम या चित्रपटात आवाज निवेदक म्हणून त्यांची फिल्मी कारकीर्द सुरू झाली. त्यांनी १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला जंजीर, दीवार आणि शोले यांसारख्या चित्रपटांसाठी लोकप्रियता मिळवली. हिंदी चित्रपटांमधील भूमिकांसाठी त्यांना भारताचा अँग्री यंग मॅन म्हणून संबोधले गेले.



अमिताभ यांना बॉलीवूडचा शहेनशाह (त्यांच्या १९८८मधील शहेनशाह चित्रपटाच्या संदर्भात), महानायक, स्टार ऑफ द मिलेनियम, किंवा बिग बी म्हणून संबोधले गेले. त्यांनी पाच दशकांहून अधिक कालावधीच्या कारकिर्दीत ५२००हून अधिक भारतीय चित्रपटात काम केले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक पुरस्कार जिंकले, ज्यात सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून चार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार म्हणून दादासाहेब फाळके पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये अनेक पुरस्कारांचा समावेश आहे. त्यांनी एकूण १६ फिल्मफेअर पुरस्कार जिंकले आहेत तसेच एकूण ४२ नामांकनांसह फिल्मफेरमधील कोणत्याही प्रमुख अभिनय श्रेणीमध्ये ते सर्वाधिक नामांकित कलाकार आहेत.

अभिनयासोबतच बच्चन यांनी पार्श्वगायक, चित्रपट निर्माता आणि दूरचित्रवाणी प्रस्तुतकर्ता म्हणून काम केले आहे. त्यांनी गेम शो कौन बनेगा करोडपतीचे अनेक सीझन होस्ट केले आहेत. १९८० च्या दशकात त्यांनी काही काळ राजकारणातही प्रवेश केला होता.

भारत सरकारने त्यांना कलेतील त्यांच्या योगदानाबद्दल १९८४मध्ये पद्मश्री, २००१मध्ये पद्मभूषण आणि २०१५मध्ये पद्मविभूषण देऊन सन्मानित केले. २००७मध्ये फ्रान्स सरकारने त्यांचा सर्वोच्च नागरी सन्मान, नाईट ऑफ द लीजन ऑफ ऑनरने सन्मानित केले.

भारतीय उपखंडाच्या बाहेर त्यांचे आफ्रिका (दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका आणि मॉरिशस), मध्य पूर्व (विशेषत: यूएई आणि इजिप्त), युनायटेड किंग्डम, यासह दक्षिण आशियाई देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर परदेशी चाहते आहेत. रशिया, कॅरिबियन (गियाना, सुरीनाम आणि त्रिनिदाद आणि टोबॅगो), ओशनिया (फिजी, ऑस्ट्रेलिया आणि न्यू झीलंड) आणि युनायटेड स्टेट्स येथेही खूप मोठ्या प्रमाणात बच्चन यांचे चाहते आहेत. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन की अँण्ड्रॉईड कुठला फोन आहे खास?

स्मार्टफोन ही आता काळाची गरज झाली आहे. देशभरात किंवा जगभरात संवाद साधण्यासाठीचं ते एक महत्त्वाचं माध्यम आहे. या फोनमध्ये दोन प्रकार पडतात एक आहे. स्मार्ट फोन घेताना आपण अँण्ड्रॉईड फोन घ्यावा की आयफोन असा प्रश्न अनेकांना पडतो. अँण्ड्रॉईड आणि आयफोन या दोन्ही मोबाइल्सना प्रचंड मागणी असते. यामधला चांगला पर्याय काय असू शकतो? चला जाणून घ्या.



अमेरिकेतली अॅपल ही कंपनी आयफोनची निर्मिती करते. या कंपनीत एलिट उत्पादन तयार केलं जातं. आयफोन हा जगातला सर्वात महाग फोन आहे तसंच जगभरात आयफोनचा वेगळा चाहता वर्ग आहे. आयफोनची सर्वात मोठी खासियत आहे त्यातील सुरक्षा. आयफोन अॅपल कंपनीचं डिझाईन आणि सॉफ्टवेअर यामध्ये वापरण्यात येतं. त्यामुळे आयफोन हा इतर स्मार्टफोन्सच्या तुलनेत उत्तम आहे. कंपनीला हे माहीत असतं की फोनमध्ये काय पार्ट आणि फिचर्स आहेत. अॅपलच्या आयफोन सॉफ्टवेअरमध्ये काही समस्या आली, तर ती अधिकृत सर्व्हिस सेंटरमध्येच ठीक केली जाते. आयफोनचे निवडक मॉडेल्सच उपलब्ध आहे.

आयफोनमध्ये अँण्ड्रॉईड फोन प्रमाणे मोठ्या प्रमाणावर अॅप्लिकेशन्स नसतात. जे अॅप्लिकेशन्स असतात त्यांचा दर्जा सांभाळण्यात आलेला असतो तसंच लेटेस्ट टेक्नॉलॉजीद्वारे आयफोन अपडेटही होतो. आयफोन अँण्ड्रॉईडच्या तुलनेत महाग असतो यात काही शंकाच नाही. आयफोनची किंमत ५० हजारांपासून पुढे सुरू होते. आयफोनची खासियत आहे ती म्हणजे गोपनियता किंवा प्रायव्हसी. प्रायव्हसी इज द किंग या तत्त्वावर त्यांचं काम चालतं.

अँण्ड्रॉईडचा फोन म्हणजे ज्यांची ऑपरेटिंग सिस्टिम अँण्ड्रॉईड असते. अनेक स्मार्ट फोनमध्ये सर्रास ही सिस्टीम वापरली जाते. अँण्ड्रॉईड हे गूगलचं सॉफ्टवेअर आहे. हे एक प्रकारचं ओपन सोर्स सॉफ्टवेअर आहे. अँण्ड्रॉईडचे फिचर्स वेगवेगळे असते. अँण्ड्रॉईडमध्ये अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

# संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर

**निमित्त**

भारतातील परम या सुपर कॉम्प्युटरच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी ते प्रसिद्ध असलेले व भारतीय संगणक शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञानातील नेते आणि शिक्षणाचे वकील विजय पांडुरंग भाटकर यांचा आज जन्मदिन आहे. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्री आणि महाराष्ट्र सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केलेला आहे.



डॉ. विजय भटकर यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४६ रोजी महाराष्ट्रात अकोला जिल्ह्यातील मुरांबा येथे झाला. मूर्तिजापूर येथील संत गाडगे महाराजांनी स्थापन केलेल्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या डॉ. भाटकरांनी वयाच्या १८व्या वर्षी अभियांत्रिकी पदवी मिळवली. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातून एमटेक केल्यानंतर ते दिल्लीच्या आयआयटीमध्ये दाखल झाले. वयाच्या अवघ्या २६व्या वर्षी त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांनी आयआयटी दिल्ली, नागपूर येथील सर विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि एमएस वडोदरा येथील विद्यापीठात अनुक्रमे १९६५मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि १९६८मध्ये अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी घेतली. पुण्यातील सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंगमध्ये डॉ. भाटकर यांनी १९८७मध्ये सुपर कॉम्प्युटर तयार करण्याच्या प्रकल्पावर देखरेख केली. यामुळे भारतातील पहिले सुपर कॉम्प्युटर, परम ८००० आणि परम १०००० तयार झाले.

डॉ. भटकर यांनी त्यांच्या इतर कर्तृत्वाव्यतिरिक्त ८०हून अधिक संशोधने लिहिली, संपादित केली आणि तयार केली. कॉम्प्युटर सायन्सच्या क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे ते अध्यक्ष आहेत. या व्यतिरिक्त ते विज्ञान भारतीचे नेते आहेत. आयआयटी दिल्लीने त्यांना १९७२मध्ये अभियांत्रिकीमध्ये पीएचडी प्रदान केली. आयटी शिक्षण आणि संशोधन अधिक करण्यासाठी डॉ. भटकर यांनी आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली. या संस्थेत अध्यापनासह उच्च शिक्षण संशोधन सुविधांचे नियोजन करण्यात आले.

डॉ. भटकर यांनी लिहिलेल्या आणि संपादित केलेल्या बारा पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे आणि त्यांनी ऐंशीहून अधिक संशोधनात्मक लेखही दिले आहेत. २०३०पर्यंत भटकरांच्या मते, भारत चीन आणि अमेरिका या दोघांनाही मागे टाकून जगातील आघाडीचे राष्ट्र बनणार आहे. राष्ट्राला सशक्त, दूरदर्शी प्रतिनिधित्व आणि त्यासाठी योग्य दिशा हवी आहे. रॉयल सोसायटीने २००३मध्ये शास्त्रज्ञांचा एक गट दक्षिण आफ्रिकेत पाठवला आणि विजय भटकर यांनी त्यांचे नेतृत्व केले.

संत गाडगे महाराजांचा आदर्श समोर ठेवून विज्ञान व अध्यात्माची सांगड घालत ते कार्यरत आहेत. संपूर्ण देशातील तीर्थक्षेत्रे 'ज्ञानतीर्थक्षेत्रे' व्हावीत यासाठी आळंदीपासून त्या स्वरूपाचे काम त्यांनी सुरू केले आहे. युरोपियन संस्कृतीचा अभ्यास करणारे तसेच आध्यात्मिक अनुभूतीसाठी ध्यानधारणा करणारे व आजही सक्षमतेने कार्यरत असलेले डॉ. विजय डॉ. भटकर भारतीय युवकांचे आदर्श ठरलेले आहेत. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : येथील समुद्रकिनारी पर्यटक स्पीडबोट राईडचा मनमुराद आनंद घेत असतात.**

## आरोग्य प्रहर

# वायू प्रदूषणामुळे हृदयरोगाचा धोका! जाणवतात 'ही' लक्षणे

बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या बदलत्या सवयी यामुळे आजकाल लोकं अनेक समस्यांना बळी पडत आहेत. हृदयविकार ही यापैकी एक समस्या आहे, ज्यामुळे आजकाल बरेच लोकं त्रस्त आहेत. अलीकडच्या काळात हृदयविकाराच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. हृदयविकाराचा झटका ही एक वैद्यकीय आणीबाणी आहे ज्यामध्ये रक्ताची गुठळी हृदयात रक्त प्रवाहासाठी बाधा ठरते हृदयाला ऑक्सिजनपासून वंचित ठेवते.



हृदयविकाराच्या झटक्याला अनेक घटक कारणीभूत आहेत, त्यातील एक हवा प्रदूषण आहे. अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की वायू प्रदूषणामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि हृदयाच्या कार्यात अनियमतता होऊ शकते. वायू प्रदूषणामुळे हृदयविकाराचा झटका कसा येतो आणि तो कसा टाळता येईल हे जाणून घेऊया.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या प्रदूषणाचा आपल्या आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. हृदयाच्या विफलतेच्या बाबतीत म्हणजेच ज्याला आपण हार्ट फेल्युअर म्हणतो, वायू प्रदूषणामुळे रक्त पंप करण्याची हृदयाची क्षमता आणखी कमी होऊ शकते. या प्रभावांना चालना देण्यासाठी अधिक चिंतेची बाब म्हणजे प्रदूषणाचे अत्यंत लहान कण, जे धुके, धूर आणि धूळ म्हणून दृश्यमान हवेत आढळतात.

वायू प्रदूषणामुळे अनेकांना हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. वृद्ध लोकं आणि हृदयरोग किंवा स्ट्रोकसाठी जोखीम घटक असलेल्या लोकांना जास्त धोका असू शकतो. याशिवाय हृदयविकाराचा झटका, एनजाइना, बायपास शस्त्रक्रिया, स्टेंटसह किंवा त्याशिवाय अँजिओप्लास्टी, स्ट्रोक, मान किंवा पायाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा, हृदय अपयश, मधुमेह किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज अशा लोकांना जास्त धोका असतो. याशिवाय खालील लोकांनाही जास्त धोका असतो.

तुम्हाला हृदयविकार असेल किंवा पक्षाघाताचा झटका आला असेल तर वायू प्रदूषण टाळण्यासाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

ताज्या घडामोडी आणि आकर्षक जाहिरातीसाठी दै. रामप्रहर

# वडगाव ग्रामपंचायतीमध्ये पाण्यासाठी महिलांची वणवण

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वडगावमध्ये महिला वर्गास पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.

ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मजल दरमजल करून पाणी मिळवावे लागत आहे. गावात नळपाणी पुरवठा योजना असून पाणी दोन-चार दिवसांतून एकदाच मिळत असल्याचे महिलांचे म्हणणे आहे. मिळणारे पाणीसुद्धा मुबलक प्रमाणात मिळत नसल्याचा आरोप येथील महिलांनी केला आहे. येथील महिला वर्गास गेली अनेक वर्षे डोक्यावर हंडा घ्यावा लागत आहे. या ग्रामपंचायतीमध्ये सध्या प्रशासकीय कारभार सुरू आहे, मात्र तरीसुद्धा येथील समस्या सोडविण्याचे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे.





**गावामध्ये नळ योजना असूनही पाणी मिळत नाही. पावसाळ्यात ही स्थिती असेल तर उन्हाळ्यात गंभीर स्थिती निर्माण होइल.**
**-सुरेखा गडगे, ग्रामस्थ महिला**

**परिस्थितीचा आढावा घेऊन संबंधितांना सूचना देणार असून पाण्याचा प्रश्न सुटेल अशी व्यवस्था केली जाईल.**
**-संदीप कराड, गटविकास अधिकारी, खालापूर**

**गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसी कडून सध्या ५० टक्के पाणीपुरवठा केला जात आहे. यातील ८० टक्के पाणीपुरवठा वडगाव गावाला केला जात आहे, मात्र गावातील अंतर्गत पाईपलाईन टाकण्याचे काम अपूर्ण असल्याने पाणीटंचाई जाणवत आहे. या पाईपलाईनचे काम पूर्ण झाले की, सर्वांना पुरेसा पाणीपुरवठा होईल.**
**-सुहास वारे, ग्रामसेवक**

## ज्येष्ठ उद्योजक रतन टाटांना श्रद्धांजली



**नागोठणे** : ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांचे बुधवारी (दि.९) मुंबई येथे निधन झाले. नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अखलाक पानसरे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, सचिन ठोंबरे, शबाना मुल्ला, ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे उपस्थित होते.


# महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड,
ई- निविदा सूचना क्रमांक १६ (सन २०२४-२५

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये (उपकर व रायल्टी इ. कर अंतर्भूत) |
|---|---|---|
| १) | महादेवखार महाळुंगे खारभूमी योजना, ता. रोहा, जि. रायगड या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | ३,५९,३३,९५८/- |
| २) | धाकटापाडा शहापूर खारभूमी योजना, ता. अलिबाग, जि. रायगड या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | ३,१२,६६,४४२/- |
| ३) | मनोरंजन खारभूमी योजना, ता. अलिबाग, जि. रायगड या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | ४,४६,१५,६१७/- |
| ४) | करंजविरा खारभूमी योजना, ता. रोहा, जि. रायगड या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | ४,२२,०१,५१९/- |

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १४.१०.२०२४ ते २१.१०.०२४ पर्यंत
ई - निविदा उघडणे :- दिनांक २२.१०.२०२४
सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवर कळविण्यात येईल http://mahatenders.gov.in

सही/-
(वि. पी. पाटील)
कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण-रायगड.



# महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड
web-kidc.maharashtra.etenders.in& email-eerid24@gmail.com
**निविदा सूचना क्र २७ सन २०२४-२५ (दुसरी मागणी)**

**कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड** (दुरध्वनी क्र.०२१९४/२५०८५७) महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा खात्याकडे प्रस्तावित खालील कामांकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब.१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावे. तसेच निविदा स्विकारणाच्या अथवा नाकारण्याचा अधिकारी **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड यांनी राखून ठेवलेला आहे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा किंमत | इसार बयाणा रक्कम | काम पुर्ण करणचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाड शाखेंतर्गत खैरे लपा योजनेची सांडवा बार बांधणे व सांडव्याच्या दोन्ही बाजूस संरक्षण भिंत बांधणे तसेच धरण माथ्यावर भराव करणे तसेच HR well 'Yrb RCC PIPE CONDUIT च्या गाळाचे निष्काशन करणे, नवीन मेष टाकने तसेच धरणावर गेजपट्टी लावणे इतर अनुषंगिक कामे करणे | ६९,९८,८२३/- | ७०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- रु.२३६०/- (ना-परतावा) | वर्ग-४ अ व त्यावरील |

## ई- निवेदेचे वेळापत्रक

**निविदा उपलब्ध कालावधी दि. ११/१०/२०२४ ते दि. १८/१०/२०२४**
**ई-निविदा उघडण्याचा दि. २१/१०/२०२४**
**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ताः कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ ई-मेल eerid24@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

**टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

विमाका/कोवि/२०२४-२०२५/१८९

सही/-
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.



# TENDER NOTICE

**J. B. S. P. SANSTHA'S RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL**, Invites sealed TENDERS in 2 envelope system from reputed, experienced and qualified contractors for the work mentioned below:

1) **Name of Work :** Electrical Works at RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL at PLOT NO-11, SECTOR-19, KHARGHAR, NAVI MUMBAI on **Labour & with Material basis.**
2) **Estimate cost :** Rs 62,50,000 (Rupees Sixty Two Lakhs Fifty Thousand only )
3) **E.M.D. :** Rs 62,500/- (Rupees Sixty Two Thousand Five Hundred only) by DD of Nationalized Bank in favour of RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL
4) **Cost of blank Tender :** Rs.1,000/- (Rupees One Thousand Only Non-refundable)
5) **Criteria :** a) The average turnover of contractor for last three years should not be less than 80 Lakhs.
   b) The contractor should have completed 1 jobs of similar work of Not less than 60 Lakhs. Each in last three financial years or 2 jobs of similar work of Not less than 60 Lakhs. Each in last three financial years.
6) **Place of sale of Tender :** RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, PLOT NO-11, SECTOR-19, KHARGHAR, NAVI MUMBAI From 11.00 am to 5.00 p.m on 11/10/24 to 18/10/24
7) **Prebid Meeting : Friday 18/10/2024** at : RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, PLOT NO-11, SECTOR-19, KHARGHAR, NAVI MUMBAI at 05.00 PM.
8) **Date of Submission of Tender :** RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL , PLOT NO-11, SECTOR-19, KHARGHAR, NAVI MUMBAI on or before Monday 21/10/2024 on or before up to 3.00 pm.
9) **Date of Opening of Tender :** Monday 21/10/2024, 4.00 pm at same place.
10) **Completion period :** 1 month

**Chairman**
**J. B. S. P. Sanstha, Panvel**



**BEFORE THE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL (SHREE M. J. PARASHAR SAHEB) [MAIN] CHHOTAUDEPUR.**

## PUBLIC NOTICE

MACP:-35/2021
Next Date: 07/11/2024
Name Of Advocate- A. N. Thakkar
Exhibit No. 23

**Applicant**
LEGAL HEIRS OF JASHAVANTBHAI LAKSHMANBHAI BARIA OF SUSHILABEN JASHAVANTBHAI BARIYA
ADDRESS - VIJOL BHIMPUR CHHOTAUDEPUR

V/s

**Opponent**
1) ULHAS BHAURAV PATIL (Driver of Mh-46-BB-7191)
ADDRESS ROOM NO B/412. AJINKYA TARA CHS PLOT NO 6/7 SEC-7 KAMOTHE MAHARASTRA RAIGARH
2) POPATBHAI MARUTIBHAI MARKAND (Owner of Mh-46-BB-7191)
ADDRESS-ROOM NO B/412, AJINKYA TARA CHS PLOT NO 6/7 SEC -7 KAMOTHE MAHARASTRA RAIGARH

Where the name applicants have institute a petition against you before this tribunal to award compensation 35,00,000/- under sec-166 of Motor vehicle act, 1998. You are therefore hereby notice to appear in person or by pleader duly instructed by you, on dated 07/11/2024 at 11:00 am without fail in this tribunal.

Take notice that in default of your appearence on the aforsaid day, the petition will be decided as per law.

Given under my hand and the seal of this tribunal, this 10th of october 2024

Sd/- (S. D. Madhar) Assistant District Court Chhotaudepur
Sd/- (B. M. Makwana) Shirastedar District Court Chhotaudepur
court seal
Sd/- (J. R. Shah) Registrar District Court Chhotaudepur


## आपटा येथील तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील आपटा गावात १८ वर्षीय तरुणीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याने दिलेल्या माहितीनुसार, आपटा येथील राहणारी स्वराली दिलीप पाटील (वय १७) हिने घरातील खोलीमध्ये लोखंडी पाईपला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन अज्ञात कारणामुळे आत्महत्या केली. स्वराली पाटीलचे वडील दिलीप पाटील यांनी याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात माहिती दिली. रसायनी पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई प्रमोद हंबीर यांनी घटनास्थळी भेट दिली व तरुणीचा मृतदेह पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोसई प्रमोद हंबीर व दाखल अंमलदार पोहवा पानपट्टे करीत आहेत.


## जाहिर नोटीस

भावेश लक्ष्मीदास सुचक
रा. बी-३०१, नीळकंठ गार्डन, बावन बंगलोजवळ,
प्लॉट नं. २९-५, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड — अपीलदार

विरुध्द

१. मंजूला रमणिकलाल राजा
रा. फ्लॅट नं. ८९-९४, चौथा मजला, बिल्डींग नं. १, बी विंग,
पीरामल नगर, एस. व्ही. रोड, गोरेगांव वेस्ट, मुंबई — जाबदार

२. दमयंती प्रभूदास कोटेजा मयत तर्फे वारस
२/१. चंद्रेश प्रभुदास कोटेजा २/२. ब्रिजेश प्रभुदास कोटेजा
रा. एव्हरग्रीन वुड्स, सी/७०३ अंधेरी कुर्ला रोड, ए.रा.एस.ए.
हॉटेलच्या समोर अंधेरी (पु) मुंबई ४०००६९

२/३. नम्रता चिराग ठक्कर
रा. ३०१, श्री. निकुंज बिल्डींग नं. २, एस.व्ही. रोड समोर,
नरीमन टॉवर जवळ, खजुरीया टॅक रोड, कांदीवली प. मुंबई ४०००६७

३. महेंद्र मोहनलाल टक्कर
रा. ५०२, श्री सिद्धीविनायक सीएचएस बंदर पाखाडी रोड,
गणेश चौक, पी.एन.बी. बँक चारकोप मुंबई, उपनगर मुंबई ४०००६७

४. स्नेहल विपूल तन्ना
रा. w/o विपुल तन्ना ठक्कर, फ्लॅट क्र ३, दुसरा मजला, १३३ नवलाल
भवन व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई ४००००४

५. कोमल कल्पेन सोढा
५ रा. बी/३०३ सुंदर बाग, मदुरदास रोड, कांदिवली वेस्ट ४०००६७

६. केवल मोहनलाल ठक्कर
रा. ५०२, श्री सिद्धीविनायक सीएचएस बंदर पाखाडी रोड,
गणेश चौक, पी.एन.बी. बँक चारकोप मुंबई, उपनगर मुंबई ४०००६७ — अर्जदार

७. उप अधीक्षक भूमि अभिलेख, पनवेल
ता. पनवेल, जि. रायगड

**विषय :-** मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील न.भू.क्र. ८३१/५/१ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत,
**संदर्भ :-** १. अर्जदार श्री. भावेश लक्ष्मीदास सुचक यांचा दि. ०६.०२.२०२४ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. ४०/२०२४/ जा.क्र. १४७६ दिनांक १९/०७/२०२४

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरणा दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख ०६.०८.२०२४, ०३.०९.२०२४ व ०१.१०.२०२४ रोजी नेमणेत आलेली होत तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १२/११/२०२४ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/ दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह **जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार** येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ४/१०/२०२४

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड, मु. अलिबाग.**



सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा/ वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | तळोजा १०४१ | तळोजे पाचनंद २६०/२०१ | २३३/२ | ०-३३-४ | ३०० चौ.मी. | भूखंड क्र.C-१, सेक्टर-३९, क्षेत्र-३०० चौ.मी. | १.) कै. महमुदमिया मो. इब्राहीम पटेल (मयत) यांचे वारस<br>१.१) मो. शफी महमुदमिया पटेल<br>१.२) रफिउद्दीन महमुदमिया पटेल<br>१.३) अब्दुल सत्तार महमुदमिया पटेल<br>१.४) मो. नासिर महमुदमिया पटेल<br>१.५) सुगराबिबी इब्राहीम पटेल<br>१.६) सुरेय्या मो. खालिद पटेल<br>१.७) शेरबानो अब्दुल रज्जाक पटेल | निरंक |
| | | | एकूण क्षेत्र | ०-३३-४ | | | | |
| १ | तळोजा ३८१ | तळोजा पाचनंद १७९ केस नं. ३३०+२१४ | १५३/११<br>१६४/४<br>१६४/५अ<br>१९९/१+२/१<br>१४९/१अ<br>१४९/५<br>१५०/४अ<br>१७७/३अ<br>१४६/२<br>१२३/१क<br>१४४/४क | ०-०८-६<br>०-१५-४<br>०-४६-२<br>०-७५-३<br>०-२४-५<br>०-११-०<br>०-२०-८<br>०-२५-८<br>०-०१-३<br>०-२९-९<br>०-०-२ | २२५० चौ.मी. | भूखंड क्र. ३४, सेक्टर-२६, क्षेत्र २२४९.७१ चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, उरण, दस्त क्र. ७२१४/२००८, हे हक्कसोडपत्रानुसार कै. लक्ष्मण पांडुरंग केणी (मयत) व कै. शांताबाई लक्ष्मण केणी (मयत) व कै. धर्मा लक्ष्मण केणी (मयत) यांचे वारस<br>१) श्री. गंगाराम लक्ष्मण केणी<br>२) श्री. रोहीदास लक्ष्मण केणी<br>३) श्री. शशिकांत लक्ष्मण केणी<br>४) श्री. जगन्नाथ लक्ष्मण केणी<br>५) श्रीमती बायमाबाई दत्तु म्हात्रे | सह. दुय्यम निबंधक, उरण, दस्त क्र. ७२१४/२००८, हे हक्कसोडपत्र सादर केलेले आहे. |
| | | | एकूण | २-५९-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देणेबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र,
खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२९१/२०२४-२५

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

# २४ महिने, ४२ निर्णय
## संकल्प निरोगी महाराष्ट्राचा



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री



सार्वजनिक आरोग्य विभागाची विश्वविक्रमी कामगिरी!

**पालखी मार्ग आणि पंढरपूर महाआरोग्य शिबिरात १५,१२,७७४ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली**

पंढरपूर महाआरोग्य शिबिराची सलग दुसऱ्यांदा व परांडा येथील महाआरोग्य शिबिराची पहिल्यांदा असे एकूण ३ वेळा **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'** मध्ये नोंद.

**कार्य आरोग्य सेवेचे, यशस्वी जन सेवेचे!**

### महिला व बालक

१) **'माता सुरक्षित तर घर सुरक्षित'** अभियानांतर्गत एकूण **४,३९,२४,१००** माता-भगिनींची आरोग्य तपासणी. त्यात **२७,९७,३९४** गरोदर मातांचा समावेश.

२) **'जागरुक पालक, सुदृढ बालक'** अभियानांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील **२,४९,५४,२५७** बालकांची सर्वांगीण आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा.

३) **मेळघाट** सारख्या दुर्गम भागासाठी **४३ कलमी** कार्यक्रमाची अंमलबजावणी.

४) गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी **'वात्सल्य'** विशेष योजना.

५) माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात **माहेरघर योजनेला मुदतवाढ.**

६) राज्यातील **स्त्री भ्रूण हत्या** रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी अंमलबजावणी तक्रार नोंदविण्यासाठी **http://amchimulgimaha.in** हे संकेतस्थळ सुरु व **१०४ टोल फ्री हेल्पलाईन.**

७) बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी आखण्यात आलेल्या विशेष उपाययोजनांना लक्षणीय यश. राज्याचा बाल मृत्यूदर केवळ **१८ प्रती १००० जन्म/बालमृत्यू शून्यावर** आणण्याकरिता विशेष प्रयत्न सुरू.

### मानसिक आरोग्य

८) जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन **व्यसनमुक्ती केंद्रे.**

९) ठाणे व कोल्हापूर (उदगाव) येथे **अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय.**

### कर्करोग आणि उपचार

१०) राज्यामध्ये ४ ठिकाणी **नवीन रेडिओथेरपी** युनिटची स्थापना.

११) कर्करोगावरील उपचारासाठी **३४** जिल्ह्यांमध्ये **केमोथेरपी डे-केअर सेंटर.**

१२) **८ मोबाईल कर्करोग निदानाची** सुविधा उपलब्ध.

### आस्थापना/रिक्त पदांची भरती

१३) राज्यातील **वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या.** अधिक पारदर्शकता आणि अचूकतेसाठी निर्णय.

१४) आरोग्य सेवेत गट 'क' व 'ड' संवर्गातील **रिक्त १०,९४९ पदांची पारदर्शक भरती.**

१५) **वैद्यकीय अधिकाऱ्यांची** युद्धपातळीवर भरती. **१,४४६** अर्हताधारक उमेदवारांना पदस्थापनेचे **ऑनलाईन आदेश.**

* **२८३ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑनलाईन नियुक्तीचे आदेश.**
* **राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देण्यास मंजुरी.**

### आरोग्य सुविधा

१६) **हृदयरोग रुग्णांसाठी** राज्यात **१६** ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब, **२२** ठिकाणी एमआरआय, **४९५** ठिकाणी डायलिसीस सुविधा.

१७) धाराशिव येथे **'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय'** सुरू.

१८) आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह **१,७५६ ॲम्बुलन्स** खरेदीचा निर्णय.

१९) राज्यातील रुग्णांना किडनी स्टोन आजारावर अत्याधुनिक उपचारासाठी **लिथोट्रीप्सी** उपचार सेवा.

२०) रुग्ण मृत्यू पावल्यास मृतदेह रुग्णालयातून नेण्यासाठी **प्रत्येक तालुक्यात एक शववाहिका.**

२१) **२३४** तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयात **डायलिसीस सेवा.**

२२) प्रत्येक जिल्ह्यात **हिमोफिलिया डे-केअर** सेंटर उपलब्ध.

२३) राष्ट्रीय **सिकलसेल** मिशन अंतर्गत **३० लाखांपेक्षा जास्त** नागरिकांची सिकलसेल तपासणी.

२४) साथरोगाच्या उद्रेक, रुग्ण संख्या व मृत्यूमध्ये **लक्षणीय घट.**

### तरुण आणि ज्येष्ठ नागरिक

२५) **'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे'** अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे **३ कोटीपेक्षा** अधिक पुरुषांची तपासणी.

२६) **मोतिबिंदूमुक्त** महाराष्ट्र अभियानांतर्गत **१ लाखांपेक्षा** अधिक शस्त्रक्रिया.

### पायाभूत सुविधा

२७) पंढरपूर येथे राज्यातील पहिले **१,००० खाटांचे** वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेसाठी कायमस्वरूपी सुसज्ज रुग्णालय.

२८) **महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना.**

२९) पुणे, अहिल्यानगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये **३०** खाटांची **आयुष रुग्णालये.**

३०) राज्यात आतापर्यंत **३४७ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'** कार्यान्वित. ७०० 'आपला दवाखाना'ची अंमलबजावणी सुरु.

३१) **'सुंदर माझा दवाखाना'** अभियानांतर्गत आरोग्य संस्थांची स्वच्छता आणि सुशोभीकरण.

३२) **राज्यातील १५ आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांचे** मा. पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण.

### महाआरोग्य शिबीर

३३) **'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी'** उपक्रमांतर्गत
वर्ष २०२३ - **११ लाखांपेक्षा** अधिक
वर्ष २०२४ - **१५ लाखांपेक्षा** अधिक
**२ वर्षात २६ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी** आणि संदर्भ सेवा.

३४) पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराची **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'**मध्ये नोंद.

३५) ग्रामीण भागातील जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी परांडा येथे **महाआरोग्य शिबीर.**

### मोफत उपचार व आरोग्य संरक्षण

३६) **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे** आरोग्य संरक्षण **रु. १.५० लाखांवरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढवले.** योजना राज्यातील सर्व रहिवाशांना लागू. **(रेशन कार्ड अट रद्द)**

३७) राज्यात सुमारे **५ कोटी** पेक्षा जास्त जनतेची आयुष्मान भारत डिजिटल अकाउंट नोंदणी.

३८) सर्व नागरिकांना १५ ऑगस्ट २०२३ पासून **मोफत वैद्यकीय उपचार.** गेल्या वर्षभरात बाह्यरुग्ण लाभार्थी संख्येत दुपटीने वाढ.

### आशा व गटप्रवर्तक/कर्मचारी

३९) आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना कर्तव्य बजावताना अपघाती मृत्यू झाल्यास **रु. १० लाख** व कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास **रु. ५ लाख** सानुग्रह अनुदान.

४०) **आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यामध्ये भरघोस वाढ.** मासिक मानधनामध्ये **रु. ५,०००** वाढ. आता **रु. १३,०००** प्रती महिना.

४१) **आशा गटप्रवर्तकांच्या मोबदल्यामध्ये रु. ४,००० भरघोस वाढ.** आता प्रती महिना **रु. १९,९७५.**

४२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या **कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर सामावून घेण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.**



**मोफत आरोग्य सल्ला मिळविण्यासाठी डायल करा टोल फ्री क्रमांक १०४**

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रा. डॉ. तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

# महाड भूमी अभिलेख विभागात सावळागोंधळ

## काम मार्गी लागण्यासाठी नागरिकांना माराव्या लागताहेत चकरा

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुका भूमी अभिलेख कार्यालयात अपुरा कर्मचारीवर्ग, प्रभारी अधिकारी यामुळे या विभागात सध्या सावळागोंधळ सुरू आहे. त्यातच कर्मचाऱ्यांच्या मनमानीपणामुळे या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत.



महाड तालुक्याचा विस्तार मोठा आहे. भौगोलिकदृष्ट्या क्षेत्रदेखील मोठे आहे. यामुळे येथील तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये सतत नागरिकांची वर्दळ असते. जमीन क्षेत्राशी संलग्नित असलेल्या कामांसाठी नागरिकांची गर्दी असते. त्यातच महाड तालुक्यामध्ये जमीन खरेदी विक्री व्यवहार मोठ्या प्रमाणावर असल्याने जमिनीशी संबंधित दाखले मिळवण्याकरिता तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये महाडसह मुंबई, पुणे, सुरत आदी शहरांमधील नागरिकांचा ओढा कायम असतो.

गेले काही दिवसांपासून महाड तालुका भूमी अभिलेख कार्यालयात माणगाव येथील अधिकारी श्री. सोनार यांच्याकडे महाड कार्यालयाचा पदभार सोपवलेला आहे. हा पदभार प्रभारी असल्याने ते ठराविक दिवशी महाडमध्ये येत असतात. त्यातच अनेक कर्मचारी बदली झालेल्या असल्याने त्या जागी नवीन कर्मचारी दाखल झालेले नाही. यामुळे अपूर्ण कर्मचाऱ्यांचा त्रास नागरिकांना होत आहे. एका कामासाठी नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. महाड तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना मनमानी आणि उद्धट वर्तन अनुभवास मिळत आहे. यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

बिरवाडी येथील गणेश दाजी सावंत यांनी आपल्या एका जागेची रीतसर मोजणी करून मिळावी याकरिता अर्ज केला होता. अर्जानुसार तालुका भूमी अभिलेख कार्यालयाने सावंत यांच्याकडून जमीन मोजणीची रक्कम भरून घेतली व त्यासाठी तारीख देण्यात आली, मात्र काही दिवसांनी तुमची जमीन मोजता येणार नाही याकरिता हरकत घेण्यात आली असल्याचे सांगितले.

सावंत यांनी महाड तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये धाव घेतली असता ज्यांचे नाव कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सांगितले त्या हरकत घेणाऱ्या व्यक्तीचा या जमिनीशी कोणताच संबंध नसल्याचे किंवा चतुर सीमामध्येदेखील ते कुठेच नसल्याचे सावंत यांनी सांगितले. शिवाय त्यांनी दिलेल्या अर्जावरदेखील अर्जदाराची सही नसल्याचे दिसून आले. त्यामुळे या कार्यालयामध्ये मनमानी सुरू असल्याची तक्रार सावंत यांनी केली आहे.

पूर्वी असलेले अधिकारी श्री. चौधरी यांची बदली झाल्यानंतर या ठिकाणी प्रभारी अधिकारी नेमण्यात आले आहेत. यांच्याकडून प्रकाराची गंभीर दखल घेणे अपेक्षित असल्याचे सावंत म्हणाले.

महाड तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जमीन मोजणी प्रकरणांसंदर्भात वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. फेऱ्या मारूनदेखील कार्यवाही होत नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणीदेखील होत आहे.

# पेण अर्बन बँकेच्या निबंधकांकडून आश्वासन;

## कर्जतमधील उपोषण १० दिवसांनी स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथे दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या ठेवीदारांना त्यांची अनेक वर्षे अडकलेली रक्कम मिळावी यासाठी उपोषण सुरू होते. पेण बँक संघर्ष समिती आणि पोलीस मित्र संघटना यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपोषणास दहाव्या दिवशी शासनाने नियुक्त केलेल्या पेण बँक निबंधकांनी भेटून शासनाच्या वतीने आश्वासन दिले. त्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

पेण बँक संघर्ष समितीचे कर्जत, खालापूर तालुक्यातील पदाधिकारी आणि पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी ३० सप्टेंबरपासून कर्जत येथील लोकमान्य टिळक चौकात प्रथम चार दिवस साखळी आणि नंतर सहा दिवस बेमुदत उपोषण सुरू केले. या उपोषणकर्त्यांनी कर्जत शहरात रास्ता रोको केल्यानंतर पेण बँकेवर नेमलेल्या निबंधकांनी कर्जत येथे येऊन उपोषणकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

पेण अर्बन बँक बंद होऊन १४ वर्षे झाली असूनही अजून ठेवीदार, खातेदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम परत मिळाली नाही हे या वेळी निबंधकांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. संघर्ष समितीतर्फे तहसीलदार धनंजय जाधव यांच्याकडे लेखाजोखा सादर करण्यात आला. त्यानंतर उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे बँकेच्या प्रशासक मंडळाकडून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, उपसंचालक, डायरेक्टोरेट ऑफ एन्फोर्समेंट, डिपॉझिट इन्शुरन्स अँण्ड क्रेडिट गॅरंटी कापर्पोरेशन यांना त्याबाबत सूचित करण्यात आले. त्यानंतर रायगड जिल्हाधिकारी यांनी आपला अहवाल सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनाही त्यांचे स्तरावरुन संबंधित विभागांना कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

याशिवाय १६ ऑक्टोबर रोजी पेण बँक संघर्ष समिती आणि कृती समिती यांची शासन बैठक घेणार आहे. त्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले.

या वेळी प्रदीप शहा, मोहन सुर्वे, दिनकर वैद्य, विराज पाठक आदींसह खातेदार व ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुंभिवलीतील ‘त्या’ नागाला अखेर सर्पमित्राने पकडले

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कुंभिवली गावात राहणाऱ्या मूळच्या जळगावच्या राठोड कुटुंबाच्या चाळवजा घरातून सर्पमित्राने नागाला पकडले. याच नागाच्या दंशामुळे काही दिवसांपूर्वी या कुटुंबातील मुलाचा मृत्यू झाला होता.

काही कामानिमित्त राठोड पत्नीसह आपल्या मूळ गावी जळगाव येथे गेले होते. त्या वेळी त्यांची सोळा वर्षांची दोन जुळी मुले कुंभिवली येथील घरातच होती. दोन्ही मुले झोपलेली असताना त्यातील अर्जुन नावाच्या मुलाच्या गालावर नागाने दंश केला. साधारणतः अर्ध्या तासाने नाग तेथून निघून गेल्यानंतर गावकऱ्यांनी त्या मुलाला खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी हलवले. तोवर त्याच्या शरीरात नागाच्या विषाचा परिणाम जाणवू लागला होता. त्यात दुर्दैवाची बाब म्हणजे खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंश प्रतिरोधक लस उपलब्ध नव्हती. म्हणून एमजीएम हॉस्पिटल, कामोठे-पनवेल येथे उपचारार्थ हलवत असताना अर्जुनाचा रस्त्यातच मृत्यू झाला.

अर्जुनच्या मृत्यूनंतर राठोड कुटुंबीय जळगाव येथे गेले असल्याने त्यांचे घर बंद होते. दरम्यान, राठोड यांच्या बंद घराच्या दाराच्या फटीतून नाग साप आत शिरताना शेजाऱ्यांनी पाहिला. त्यांनी तत्काळ सर्पमित्र अमोल ठकेकर यांना संपर्क करून याबाबत माहिती दिली. ठकेकर यांनी या नागाला पकडले. त्यामुळे कित्येक दिवस कुंभिवलीकरांच्या मनात असलेली या नागाची दहशत संपुष्टात आली आहे.



# ताडवाडी येथे अंतर्गत रस्ते नूतनीकरणाचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते यांच्या हस्ते मुरूड तालुक्यातील वळके ग्रामपंचायत हद्दीत ताडवाडी येथे रस्ते नूतनीकरणाचे भूमिपूजन करण्यात आले. या कामासाठी अ‍ॅड. मोहिते यांच्या प्रयत्नातून निधी उपलब्ध झला आहे.



या कार्यक्रमास भाजप तालुका अध्यक्ष शैलेश काते, सरचिटणीस जीवन सुतार, संदीप चिरायू, उपाध्यक्ष गणेश कट, उपसरपंच संदीप ठाकूर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रशांत भोय, नितीन आर्डे, विकास म्हात्रे, जगदीश म्हात्रे, राजेश सुतार, दयानंद, हरेश यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थांची उपस्थिती होती.

या वेळी ताडवाडी अंतर्गत जगन्नाथ शेडगे ते ताडेदेवी मंदिर जोडरस्ता (आठ लाख रुपये निधी) आणि नारायण घाग ते हिराजी पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे (पाच लाख रुपये निधी) या रस्तांच्या नूतनीकरणासाठी भूमिपूजन करण्यात आले.

# एकदरा येथे श्रीराम मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन

**मुरूड : प्रतिनिधी**

एकदरा ग्रामपंचायत हद्दीत श्रीराम मंदिर सभामंडपासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून सुमारे १५ लाख रुपये प्राप्त झाले आहेत. या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन शिवसेनेचे रायगड जिल्हा संघटक दिनेश मिणमिणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी शिवसेनेचे नेते विघ्नेश माळी, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुका संघटक यशवंत पाटील, तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उपतालुकाप्रमुख मनोज कमाने, शीघ्रे माजी सरपंच संतोष पाटील, युवा नेते दीपेश वरणकर, तेलवडे उपसरपंच निलेश तांबडकर, अविनाश शिंदे, जगन वाघरे, चअेरमन पांडुरंग आगरकर आदी उपस्थित होते. या वेळी संघटक दिनेश मिणमिणे यांनी, एकदरा ग्रामस्थांनी मागणी केल्याप्रमाणे आमदार दळवी १५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. लोकांनी त्यांना खंबीर समर्थन देऊन दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आणावे, असे आवाहन केले.



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**ई- निविदा सुचना**

**मलनि:स्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | PMC/ SEWERAGE /20/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या नविन पनवेल (पुर्व), सेक्टर-५ येथील मलउदंचन (SPH) P-१ केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ७,८५,३२,३४१.०० | ३,९३,०००/- | ३,५४०/- |
| २. | PMC/ SEWERAGE /21/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या नविन पनवेल (पश्चिम), सेक्टर-२ येथील मलउदंचन (SPH) P-२ केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ९,५९,७४,८६७.०० | ४,८०,०००/- | ३,५४०/- |
| ३. | PMC/ SEWERAGE /22/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या नविन पनवेल (पुर्व), सेक्टर-५ अे येथील मलउदंचन (SPH) P-३ केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ७,२३,७६,४३५.०० | ३,६२,०००/- | ३,५४०/- |
| ४. | PMC/ SEWERAGE /23/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या खारघर, सेक्टर-७ येथील मलउदंचन (SPH) केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ४,६४,७३,४१९.०० | २,३२,५००/- | २,३६०/- |
| ५. | PMC/ SEWERAGE /24/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या खारघर, सेक्टर-९ येथील मलउदंचन (SPH) केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ३,८६,१३,९८७.०० | १,९३,५००/- | २,३६०/- |
| ६. | PMC/ SEWERAGE /25/2024-25. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या खारघर, सेक्टर-११ येथील मलउदंचन (SPH) केंद्रांचे नुतनीकरण करुन पुढील तीन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | ८,८३,२५,८९८.०० | ४,४२,०००/- | ३,५४०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

**जा. क्र/पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.५४५/५४७/२०२४**
**दिनांक १०/१०/२०२४**

**सही/-**
**अतिरीक्त आयुक्त - I**
**पनवेल महानगरपालिका**




सिडको
शहरांचे शिल्पकार
सत्यमेव जयते
नरेंद्र मोदी
पंतप्रधान
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
नांदी अभिनव प्रकल्पांची, हमी उज्ज्वल भविष्याची
सिडकोच्या विविध प्रकल्पांचे भूमिपूजन,
उद्घाटन तथा लोकार्पण
शुभहस्ते
एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री
वेळ व दिनांक
शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता
स्थळ
सिडको प्रदर्शन केंद्र, सेक्टर-३०, वाशी, नवी मुंबई
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भारतीय वायु दलातर्फे सी-२९५ एअरक्राफ्टचे लँडिंग आणि सुखोई-३० एअरक्राफ्टचे फ्लायपास्ट
२६,५०२ सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ
महाराष्ट्र भवनचे भूमिपूजन
१८ होल्सच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचे उद्घाटन
नैना नगर रचना परियोजना ८ ते १२ मधील पायाभूत सुविधा विकास कामांचे भूमिपूजन
सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरीचे उद्घाटन
ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन ३८३३ सदनिका) भूमिपूजन
ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण
पश्चिम परिघीय मार्ग (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) भूमिपूजन
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
संजय शिरसाट
अध्यक्ष, सिडको
सिडको
शहरांचे शिल्पकार
शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित
नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी: ०२२-६६५००९०० फॅक्स:०२२-२२०२२५०९
मुख्य कार्यालय: सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४. दूरध्वनी: ०२२-६७९१८१०० फॅक्स: ०२२६७९१८१६६
www.cidco.maharashtra.gov.in
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
सिडको/जनसंपर्क/२९३/२०२४-२५
For updated information, follow us on- @cidco_Ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd
www.cidco.maharashtra.gov.in